**राज्यातील मेट्रो रेल्वे स्थानकांचे नामकरण करणे, नावात बदल करण्याबाबत कार्यपध्दती ठरविणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**शासन परिपत्रक क्र. एमआरडी-३३२४/प्र.क्र.१८/नवि-७**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : २३ फेब्रुवारी,२०२४

**प्रस्तावना :-**

नगर विकास विभागाच्या अखत्यारितील मुंबई,पुणे,नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण तसेच मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि., व महा मुंबई मेट्रो ऑपरेशन कॉ.लि त्याचप्रमाणे महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांच्या अधिपत्याखालील विविध मेट्रो रेल्वे प्रकल्पांचे संचलन करण्यात येते.

सदर मेट्रो स्थानकांची नावे हि भारतीय राजपत्रातील अधिसूचनेनुसार मेट्रो स्थानकांच्या नावासह मेट्रो मार्गिकचे आरेखन राज्य शासनाच्या मान्यतेनंतर केंद्र शासनामार्फत अधिसूचित करण्यात येते. तथापि राज्यातील विविध मेट्रो मार्गिकामधील मेट्रो स्थानकांची नावे बदलण्याबाबत स्थानिक नागरीक, लोकप्रतिनिधी व विविध संघटना यांची निवेदने प्राप्त होत असतात. एकाच मेट्रो स्थानकाला विविध नावे देण्याबाबत निवेदने प्राप्त होत असतात. बहुतांशी निवेदनांमध्ये मेट्रो स्टेशन्सना व्यक्तिविशिष्ठ नावे देण्याबाबत विनंती केलेली असते.तथापी मेट्रो स्थानकांची नावे बदलावयाची असल्यास संबधित मेट्रोचे संचलन करणा-या प्राधिकरण/ कंपनीने प्रथमत: नामांतरणाबाबत संचालक मंडळाच्या बैठकिमध्ये चर्चा करून समुचित ठराव करणे आवश्यक आहे. तदनंतर ठरावासह शासनास Draft Notification (Hindi & English) , प्रस्तावित सुधारणेचा Alignment Map यासह प्रस्ताव सादर केल्यास तदनंतर शासन मान्यतेने केंद्र शासनास विनंती करण्यात येते.मात्र सदर कार्यपध्दती न अवलंबता नामबदलाचे प्रस्ताव शासनास सादर करण्यात येत असल्याने याबाबत निर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती त्यानुसार पुढील प्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

**<u>शासन परिपत्रक</u>-**

१. मेट्रो स्थानकांचे नामकरण करणे/नावात बदल करणे यासाठी प्रकल्प अंमलबजावणी संस्थेने त्यांचे स्तरावर अंतर्गत समिती गठीत करून निर्णय घेणेत यावा.
२. यासाठी त्या समितीने मेट्रो स्थानकांचे नामकरण करणे/नावात बदल करण्याबाबत नागरीक, रहिवाशी कल्याण संघटना, स्थानिक लोकप्रतिनिधी व इतर संघटना यांच्याकडून प्राप्त निवेदनांचा विचार करावा.
३. तथापि, असे करताना मेट्रो स्थानकाच्या नावाने त्या क्षेत्राचे स्थानिक नाव (Geographical Identification) योग्यरित्या प्रतिबिंबित केले पाहिजे आणि ते सहज ओळखता येण्यासारखे असावे.
४. ज्या मेट्रो स्थानकांबाबत विवादास्पद बाबी असतील केवळ अशाच स्थानकांच्या नावात बदल करण्याबाबतचे प्रस्ताव अपवादात्मक परिस्थितीत मेट्रो प्रकल्पांशी संबधित संस्थांनी आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शासनास सादर करावेत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२४०२२३१८४२५८२८२५ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E1FEEA176A1E6A273C574BB6F1A1EDB58BF87424118BCCD6EE07340581733B70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2024.02.23 18:53:38 +05'30'

**( विजय चौधरी )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई- ३२
३. मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई- ३२
४. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५. महानगर आयुक्त,मुंबई,पुणे,नागपूर,नाशिक,कोल्हापुर व औरंगाबाद महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
६. व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि.,मुंबई.
७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन, मेट्रो भवन, नागपूर.
८. व्यवस्थापकीय संचालक,महा मुंबई मेट्रो संचलन महामंडळ, मुंबई